मंजिरी फडणीस



# निसर्गाच्या कुशीत बहरलंय करियर

**पर्यावरणाचा ऱ्हास आणि त्याचे दुष्परिणाम सर्वांनाच दिसताहेत. वाढत्या नागरीकरणाने जंगलांवर अतिक्रमण होतंय, हे उघड सत्य. अशा वातावरणात एक वेगळा प्रयोग पुण्याच्या केतकी आणि मानसी या दोन मैत्रिणी राबवताहेत. निसर्गाला जपणाऱ्या आणि पर्यावरणाचं व्यवस्थापन करणाऱ्या वेगळ्या क्षेत्रात करियर करणं या दोघींना जमलं. निसर्गाबरोबर जगण्याचं हे आगळं करियर त्यांना सुखावणारं लौकिक यशही मिळवून देतंय...**

नाशिकच्या जवळ आहे 'फिश लॅडर'चा प्रकल्प- माशांच्या संवर्धनासाठी 'बाएफ'ने (भारतीय ॲग्रो इंडस्ट्रीज फाउंडेशन) सुरू केलेला. तिथे ओढ्यांना होते बंधारे. माशांना अंडी घालण्यासाठी तो मोठा अडथळा होता. कारण मासे अंडी घालण्यासाठी प्रवाहाच्या उलट दिशेने उथळ भागाकडे जातात. बंधारे असल्यानं माशांना प्रवाहाच्या टोकाकडे जाता येत नव्हतं. प्रश्न होता या गतीनं मत्ससंवर्धन होणार कसं? पुण्यातल्या एका संस्थेनं ही जबाबदारी घेतली. शोध सुरू झाला. आराखडा तयार झाला. मग या बंधाऱ्यांवर पायऱ्यांसारख्या शिड्या तयार केल्या. मासे त्याचा वापर करू लागले आणि बंधारे ओलांडून पुढे जाऊ लागले. मासे चक्क शिड्या पार करून जाऊ लागले...मत्स्य-संवर्धनाचा हा प्रयोग यशस्वी झाला.

प्रश्न फक्त मत्स्यसंवर्धनाचा नव्हता. माशांच्या जगण्यात आलेला, पर्यायानं निसर्गाच्या चक्रात आलेला अडथळा दूर करणं हा खरा प्रश्न होता. ज्या दोघींनी हा अडथळा दूर केला त्या केतकी आणि मानसी सतत निसर्गाचा असाच विचार जपत असतात. प्राणी, पक्षी, झाडं आणि जमीन, अगदी जमिनीतले बारीकसारीक कृमी-कीटक, अळ्या, किडे या साऱ्यांचा विचार त्या करतात. यातील प्रत्येक घटक हा निसर्गाचा अविभाज्य भाग आहे. म्हणूनच त्यांना जगण्याचा स्वतंत्र अधिकार आहे. माणसानं स्वतःचं जगणं सुसह्य, आरामदायी बनवताना या घटकांच्या जगण्याचा अडथळा ठरू नये यासाठी या दोघींचं काम आहे. निसर्गाच्या कुशीत आपलं जगणं अधिक बहरू शकतं, हे पुण्याच्या **केतकी घाटे आणि मानसी करंदीकरनं** आपल्या वेगवेगळ्या प्रकल्पांमधून दाखवलं आहे.

त्यांचं काम समजण्यासाठी एक साधंच उदाहरण. अलीकडे 'निसर्गाच्या कुशीत घर घ्या' अशा जाहिराती सहजपणे तुम्हाला दिसतात. तिथे 'निसर्ग' म्हणून काही झाडं-झुडपं लावलेली असतात, हिरवळ दिसते. ही झाडं त्या विशिष्ट भागातल्या वातावरणाचा अभ्यास करून लावलेली असतात का? अनेकदा या प्रश्नाचं उत्तर येतं 'नाही'. ती झाडं त्या वातावरणाला पोषक नसतात, हे सगळीकडचं सर्वसाधारण चित्र. इच्छा नसताना माणसाला कुठे तरी नेऊन ठेवलं तर त्याची वाढ खुंटते, असं म्हणतात. झाडांचंही तसंच असतं. ती 'मनापासून' बहरत नाहीत. मग त्यावर पक्षी, फुलपाखरं येत नाहीत. डोळ्यांना क्षणिक सुखावणारी हिरवाई मानवी मनाला कायमचा आनंद देऊ शकत नाही. मग अशा ठिकाणी कोणती झाडं लावणं योग्य आहे, कोणते पक्षी येतात, त्यांचा किलबिलाट कसा कायम राहील, या सगळ्याचं मार्गदर्शन केतकी आणि मानसी करतात. मनाला आल्हाददायक वाटणारा निसर्गातला जिवंतपणा त्या टिकवतात.

हा जिवंतपणा टिकवणं हेच केतकी आणि मानसीचं करियर! निसर्ग जपण्याचं महत्त्व जाणणारे निसर्गप्रेमी आपल्या जमिनी या दोघींकडे सोपवतात, त्या जमिनीतून त्यांना काय अपेक्षित आहे ते सांगतात. मग निसर्ग जपत हव्या त्या गोष्टी त्या जमिनीतून विकसित करून देण्याची जबाबदारी या दोघींची. पर्यावरणातलं हे तसं वेगळं करियर. 'या करियरमध्ये आम्हाला गरजेपुरता पैसा आणि खूप सारा आनंद नक्कीच मिळतो,' असं त्या उत्साहानं सांगतात. झाडं, प्राणी, पक्षी, जमीन, ओढे यांच्याशी गेल्या आठ वर्षांत जुळलेल्या नात्यांचा आनंद त्यांच्या चेहऱ्यावर आणि त्यांच्या उत्साही बोलण्यातून क्षणोक्षणी जाणवत राहतो.

आठ वर्षांपूर्वी निसर्गाशी नात्याची वीण कशी गुंफली गेली इथूनच आम्ही सांगतो, असं म्हणत त्या स्वतःच्या करियरबद्दल आणि खूप सारं निसर्गाबद्दल बोलू लागतात. ''निसर्गाची आवड तर आम्हा दोघींना आहेच, पण हेच काम करू असं काहीच ठरवलेलं नव्हतं. आम्ही एकत्र आलो ते 'कोर्स इन नॅचरल रिसोर्स मॅनेजमेंट, रिस्टोरेशन ॲंड सस्टेनेबल डेव्हलपमेंट' या अभ्यासक्रमाच्या निमित्तानं...'' दोघी सांगतात.

मानसी इन्स्ट्रुमेंटेशन इंजिनियर, तर केतकी बी.एस्सी. बॉटनी आणि केमिस्ट्री. मानसीचं शिक्षण पर्यावरणक्षेत्रापासून खूपच वेगळं. पण या दोघींनीही प्रत्येक झाडाच्या मुळाशी जाऊन आणि मातीच्या कणाकणांचा अभ्यास केला. निसर्गाची ओढ, हाच समान धागा या दोघींमध्ये होता, जो पुढं अधिक जुळला गेला.

मानसी म्हणाली, ''कोर्सनंतर असं काम करायचं ठरवलं. दोघींच्याही घरात करियरबाबतचा पूर्ण मोकळेपणा आहे. आम्ही जो व्यवसाय निवडला त्यासाठी फारसं भांडवलही लागत नाही. त्यामुळे ते कुठून उभं करायचं हा प्रश्न नव्हता. आमच्यापुढे आव्हान होतं ते अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचण्याचं, या वेगळ्या कामाची माहिती देण्याचं आणि लोकांना निसर्ग जपण्यासाठी प्रवृत्त करण्याचं. सुरुवातीला आम्ही प्रदर्शनांचा मार्ग निवडला. प्रदर्शनांमध्ये भाग घेऊन आम्ही तक्ते, प्रेझेंटेशन याद्वारे माहिती देऊ लागलो. तुमच्याकडची जागा तुम्ही कशी विकसित करू शकता, हे करताना निसर्ग कसा जपू शकता, त्याचा तुम्हाला काय फायदा होईल, हे लोकांना समजावून सांगायचो. अनेकांना पटायचं. निसर्गाबद्दल आत्मीयता असणारे लोक अधिक चौकशी करायचे. यादरम्यान आम्ही आमच्या दोघींचीच पर्यावरण व्यवस्थापन संस्था तयार केली, 'ऑयकॉस'. आयकॉस हा मूळ ग्रीक शब्द. ज्याचा अर्थ आहे पृथ्वी किंवा घर. या शब्दापासून इकॉलॉजी शब्द बनला आहे. इकॉलॉजी म्हणजे सजीव सृष्टीचा अभ्यास. संस्था सुरू होऊन काम सुरू केल्यानंतर पहिली काही वर्षं लवासा प्रकल्पामध्ये काम केलं.''

जमिनीची चाचपणी, तिथे झाडं लावणं, वाढवणं आणि एकूणच त्या भागांचा विकास हे काही एका रात्रीत होणारं काम नाही. ते तर वर्षानुवर्षं चालणारं काम. त्यामुळे हे सगळं करण्याची पद्धत कशी ठेवली, असं विचारताच केतकी म्हणाली, ''खरंच, आमचं काम सहा महिन्यांचं असतं, वर्षात संपू शकतं किंवा दहा-पंधरा वर्षंही चालू शकतं. आम्ही सुरुवातीला त्या जमिनीची पाहणी करतो. ही पाहणी उन्हाळा, हिवाळा, पावसाळा अशा तिन्ही ऋतूंमध्ये करावी लागते. घाई असेल तर दोन ऋतूंमध्ये तरी अभ्यास करावाच लागतो. कारण कोणत्या वातावरणात तिथे कोणती झाडं येतात, ती